Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

२८ /२०२६

**विषय :** विद्यापीठ परिसराच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून नेमून दिलेल्या पार्किंग जागेत गाडया पार्क करणेबाबत..

**संदर्भ :** १) आस्थापना विभागाचे जा.क्र.२४३३ दिनांक १३ डिसेंबर २०२२ रोजीचे परिपत्रक
२) सुरक्षा विभागाचे जा.क्र.२०२६/०१ दिनांक ०७ जानेवारी २०२६ रोजी चे परिपत्रक.

सर्व संबंधितीनां आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठ परिसरातील शिस्त व सुरक्षेच्या दृष्टीकोनातून वाहन पार्किंग खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :

१. मुख्य प्रशासकीय इमारतीच्या समारे मा. कुलपती तथा राज्यपाल महोदय, मा. मंत्री महोदय, विद्यापीठाचे मा. कुलगुरु, प्र-कुलगरु, कुलसचिव, वित्त लेखा अधिकारी आणि संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ आणि व्यवस्थापन परिषद सदस्य यांची वाहने तसेच, विद्यापीठाच्या प्रशासकीय कामाकरिता वापरण्यात येणारी फक्त विद्यापीठाचीच वाहने आवश्यकतेनुसार लावली जातील. सदर वाहनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनांना मुख्य प्रशासकीय इमारतीच्या समोर तसेच, इमारतीच्या उजव्या व डाव्या बाजूच्या परिसरात वाहन पार्किंग करता येणार नाही.

२. उपरोक्त वाहन व्यतिरिक्त इतरांनी आपली वाहने प्रशासनामार्फत निश्चित करण्यात आलेल्या वाहनतळावरच पार्कींग वापर करणे बंधनकारक राहील.

३. 'No Parking' क्षेत्रात कोणत्याही परिस्थितीत आपली वाहन पार्क करू नये.

४. आपत्कालीन मार्ग, अग्निशमन मार्ग व मुख्य प्रवेश/निर्गम मार्ग नेहमी मोकळे ठेवावेत.

५. या व्यतिरिक्त विविध कार्यक्रमावेळी प्रशासकीय मान्यतेनुसार वाहन पार्कीगबाबत सुरक्षा विभागामार्फत कार्यवाही करण्यात येईल.

सदर परिपत्रकाची सर्वांनी नोंद घ्यावी व काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
**कुलसचिव**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

जा. क्र. आस्थापना / ६९३

दि. 26 MAY 2026

**प्रति,**

१) मा. कुलगुरु, मा. प्र.-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, सर्व संचालक यांचे कार्यालय
२) सर्व अधिविभागप्रमुख, समन्वयक, शिक्षक, रेक्टर, प्रशासकीय अधिकारी, सेवक
३) सुरक्षा विभाग – माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी (सूचना फलकावर प्रसिध्द करावे)
३) इंटरनेट विभाग – सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**सदरचे परिपत्रक सर्व संबंधित घटकांच्या निदर्शनास आणावे**